॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव**

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

"A" Grade NAAC Reaccredited (4th Cycle)

**विकास विभाग**

**कबचौउमवि/११ए/४२०००२०५/ २०३/२०२६** **दिनांक- ०९/०७/२०२६**

**प्रति.**
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र**
**विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे**
**मा.प्राचार्य तसेच मान्यताप्राप्त परिसंस्थाचे मा.संचालक**

**विषय:-** महाविद्यालय विकास निधी या योजनेतंर्गत बिनव्याजी कर्ज वर्ष-२०२६-२७ करिता प्रस्ताव पाठविणेबाबत...

**महोदय/महोदया,**

आर्थिक वर्ष **२०२६-२७** मध्यें विद्यापीठाच्या अर्थसंकल्पातील अर्थशिर्षांतर्गत प्राप्त आदेशान्वये आपणास कळविण्यात येते की, खालील नमुद केलेल्या आठही Themes पैकी कोणत्याही एका Theme साठी बिनव्याजी कर्ज कमाल रु **५०,०००/-** वितरण करण्यासंदर्भात प्रस्ताव मागविण्यात येत आहे.

1. Basic Sport Facilities.
2. Improvement of Information Technology facilities
3. Improvement of Facilities for Disable Students
4. Instruments for Musical & Cultural Programs
5. Purchase of Sanitary Napkin,Vending Machine & Incinerator.
6. Expenditure for Renovation of Ladies Toilet.
7. Purchase of Ladies Common Room Furniture.
8. Any other Expenditure related to facilities for Girls Student.

करिता, सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यातील **प्रस्ताव विकास विभागाकडे आवश्यक कागदपत्रासह दिनांक- ३१ / ०७ /२०२६ पर्यंत पाठवावेत**, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

**(राजेंद्र डी. पाटील)**
**कक्ष अधिकारी**
**विकास विभाग**

**सोबत :- वरिलप्रमाणे**

**प्रत सविनय सादर :-**

०१. मा.प्र.कुलगुरु महोदय यांचे कार्यालय कबचौउमवि,जळगाव.
०२. मा.वित्त व लेखाधिकारी,कबचौउमवि,जळगाव.

## विकास विभाग

# आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये महाविद्यालय विकास निधी (Interest Free loan for College Development Scheme) नियमावली / मार्गदर्शक तत्वे

विद्यापीठाच्या सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पातील अर्थशिर्ष क्र. १५.१२ (४२०००२०५) महाविद्यालय विकास निधी **(Interest Free loan for College Development Scheme)** या तरतूदींनुसार विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/परिसंस्थामध्ये प्रवेशित विद्यार्थीनीसाठी विविध सुविधासाठी विद्यापीठाकडून बिनव्याजी कर्ज वितरणाबाबतची नियमावली/मार्गदर्शक तत्वे खालीलप्रमाणे नमूद केलेली आहे.

१) "महाविद्यालय विकास निधी" (Interest Free loan for College Development Scheme) या अर्थशिर्षाखाली असलेल्या तरतूदींतून कबचौउमविशी संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परीसंस्थाना मुलभुत सुविधा उपलब्ध करण्यासाठी महाविद्यालये / परिसंस्थामध्ये प्रवेशित विद्यार्थीनीसाठी विविध सुविधांसाठी या करीता रक्कम रु.५०,०००/- बिनव्याजी कर्ज घेण्यासाठी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था पात्र ठरतील.

२) महाविद्यालय/परिसंस्थेच्या स्थापनेस ०५ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असणे आवश्यक आहे. तसेच महाविद्यालयाच्या इमारतीचे बांधकाम महाविद्यालयाच्या मालकीच्या जागेत असणे आवश्यक आहे. त्यासाठी महाविद्यालय/संस्थेच्या नावे असलेला ७/१२ उतारा प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक राहील.

३) "महाविद्यालय विकास निधी" या अर्थशिर्षातर्गत यापूर्वी लाभ घेतला असल्यास पुर्वीची रक्कम परत फेड झालेली असावी याची खात्री करावी.

४) बिनव्याजी कर्ज ०५ वर्षात फेडणे आवश्यक आहे.

५) बिनव्याजी कर्जाची परतफेड रु. १०,०००/- च्या ५ समान वार्षिक हप्त्यात करणे आवश्यक आहे.

६) कर्जाची परतफेड प्रत्येक वर्षाच्या ०१ मार्च ते ३१ मार्च या कालावधी दरम्यान करणे आवश्यक आहे.

७) कर्जाचा पहिला हप्ता ऑक्टोबर, **२०२६** पासुन सुरु होईल.

८) बिनव्याजी कर्जाची एकुण रक्कम ०५ वर्षांत महाविद्यालये / परिसंथानी परत फेड केली नाही तर उर्वरित रक्कम द.सा.द.शे. १०% दराने व्याज आकारण्यात येईल. थकीत रक्कम व्याजासह भरणा होईपावेतो संबंधित महाविद्यालयाचे संलग्नता/नुतनीकरणाचे प्रस्ताव व परीक्षा अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

९) महाविद्यालय/परिसंस्थेस कर्जाची रक्कम प्राप्त झाल्यापासून तीन महिन्यांच्या आत काय्रवाही करुन तसा अहवाल विद्यापीठास सादर करणे बंधनकारक राहील. तसे न झाल्यास वितरीत केलेली रक्कम द.सा.द.शे. १०% व्याजदराने एक रक्कमी वसूल करण्यात येईल, तसेच सदर रक्कम विद्यापीठात भरणा होईपावेतो महाविद्यालयांचे संलग्नता/नुतनीकरणाचे प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत.

## विकास विभाग

महाविद्यालये/परिसंस्थांनी विद्यापीठाच्या विकास विभागाकडे खर्चाचा तपशिल व अहवाल सादर करावेत. मा.विशेष कार्य अधिकारी, संशोधन व विकास विभाग कबचौउमवि हे प्रकरणपरत्वे पडताळणी करणेसाठी तज्ञ व्यक्तीचे नामनिर्देशन करतील.

१०) प्रकल्प कार्यवाही, आवश्यक नोंदी. व आर्थिक व्यवहार या बाबत प्रकल्पाअंतर्गत पडताळणी करण्यासाठी आलेली तज्ज्ञ व्यक्ती व महाविद्यालयांचे प्राचार्य यांचे संयुक्त सहीचे प्रमाणपत्र एक महिन्याचे आत सादर करण्याची जबाबदारी संबंधीत महाविद्यालयांवर राहील.

११) प्रकल्प प्रत्यक्ष पडताळणी करण्यासाठी नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीचा प्रवास व दैनिक भत्ता संबधीत महाविद्यालयाने विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे अदा करावा.

१२) बिनव्याजी कर्ज वितरणापासुन ते वसुलीप्रर्यंत विद्यापीठाने वेळोवेळी केलेले नियम/सुचना महाविद्यालयांना बंधनकारक राहतील.

१३) "महाविद्यालय विकास निधी" (Interest Free loan for College Development Scheme) या अर्थशिर्षाखाली असलेल्या तरतूदींतून बिनव्याजी कर्ज वितरणाचे,व्याज आकारणीचे व वसुलीचे सर्व अधिकार विद्यापीठाकडे राहतील.

१४) सदरचे बिनव्याजी कर्ज मिळणेसाठीचा प्रस्ताव दोन प्रतीत सादर करणे आवश्यक राहील.

**===XXX===**